MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

Garden Department

2nd. Floor Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia, Miraroad (East) Tal.Dist.- Thane. 401107 Tel.No. 28103409

Ref.no/MBMC/Garden/1267/2026-27 **Date:-17/11/2026**

// TENDER NOTICE //

Mira Bhaindar Municipal Corporation Garden Department invites sealed tender form for following work in two envelope system at the day 25/11/2026 up to 1.00 pm. The tender form and other relevant document will be available for download on https://mahatenders.gov.in from the date 18/11/2026 to 25/11/2026 till 1.00 pm. The tender shall be opened in the presence of the bidders or their representatives on the day 27/11/2026 at 01.00 Pm at the tender cell of Mira Bhaindar Municipal Corporation.

Sr.no	Name of work	Estimate Revenue	Earnest Money Deposit (EMD	Cost of tender documents
1.	Sale of sawdust, wood briquettes produced through the pruning of trees at the Ghodbunder project site within the Mira-Bhayandar Municipal Corporation area for a period of 5 years.	Rs.20,00,000/- (Rs Twenty Lakh only) Per Year	Rs.20,000/- (Rs. Twenty Thousand only)	Rs. 1000+180 (GST)= 1180/- (Rs. One Thousand One Hundred Eighty Only) Non Refundable

NOTE :-
1) Tender form should be submitted through Online System in two envelope
2) Tender form fee not refundable.
3) Hon. Commissioner of Mira Bhaindar Municipal Corporation has reserved Right to reject any or all bids, without assigning any reasons.
4) The Period of tender law admissibility is 120 days.

(Kavita Borkar)
Dy Commissioner (Garden)
Mira Bhaindar Municipal Corporation

मिरा भाईंदर महानगरपालिका

उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

जा.क्र.मनपा/उदयान/१२६७/२०२६-२७ **दिनांक :-१७/११/२०२६**

// जाहीर निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका उदयान विभागामार्फत खालील कामांकरिता दोन लिफाफा पध्दतीने दि.२५/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची अटीशर्तीसह निविदा N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध् असुन सदर निविदा फॉर्म दि.१८/११/२०२६ पासुन ते दि.२५/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत (डाऊनलोड करुन) भरता येतील. मुदतीत आलेल्या निविदा दि.२७/११/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष निविदा सेल मिरा भाईंदर महानगरपालिका येथे उघडण्यात येतील.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित उत्पन्न	निविदा बयाणा रक्कम	निविदा फॉर्म फी
१	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर प्रकल्प येथील झाडांची छाटणीपासून भुसा, लाकडी ठोकळे तयार करून यांची ०५ वर्ष कालावधीकरीता विक्री करणे.	रु.२०,००,०००/- (रु. वीस लाख मात्र) प्रति वर्ष	रु.२०,०००/- (रु.वीस हजार मात्र)	रु.१०००+ १८० (GST) = ११८०/- (रु. एक हजार एकशे ऐंशी मात्र) (ना- परतावा)

टिप :- १. निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर कराव्यात.
२. निविदा फॉर्म फि परत केली जाणार नाही.
३. आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकरण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेला आहे. त्याबददल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.
४. निविदा विधी ग्राहयता कालावधी १२० दिवसांचा असेल.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

// निविदा पत्रक //

सन २०२६-२७

निविदा क्र.---------- अनुक्रमांक----------

निविदा फॉर्मची किंमत रु. ---------- निविदा बयाणा रक्कम रु. ----------

निविदेचे नांव :- ----------

निविदाधारकाचे नाव श्री. / मे. ----------

पुर्ण पत्ता :- ----------

निविदा सुचना प्रसिध्दिची तारीख :- ---------- वृत्तपत्राचे नाव ----------

निविदा पत्रके विक्रीची मुदत ---------- वेळ --------

निविदा बयाणा स्विकारण्याची मुदत ---------- वेळ ----------

निविदा पत्रके स्विकारण्याची अंतिम तारीख ---------- वेळ ----------

मिरा भाईंदर महानगरपालिका

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी - २८१०३४०९

// निविदा दरसुची //

कामाचे नांव :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर प्रकल्प येथील झाडांची छाटणीपासून भुसा, लाकडी ठोकळे तयार करून यांची ०५ वर्ष कालावधीकरीता विक्री करणे.

निविदा भरणाऱ्याचे नाव व पत्ता :----------

व्यवसायाचे / संस्थेचे नाव व पत्ता :----------

निविदा बयाणा रक्कम रु. ---------- (अक्षरी रु.----------)

डि. डि. (धनाकर्ष क्र.) ---------- दिनांक ----------

बँकेचे नाव ----------

अ) महानगरपालिकेला मिळणारे उत्पन्न (Royalty)		
अ.क्र.	**तपशिल**	**दर (सर्व करांसह)**
१	घोडबंदर प्रकल्प येथील फांद्यापासून तयार करणेत आलेला भुसा (मजुर/यंत्रसामुग्री लावुन वाहनाद्वारे घेवुन जाणे.)	रु._____ /- प्रती टन
२	फांद्यापासून प्रक्रिया करणेत आलेले लाकडी ठोकळे (मजुर/यंत्रसामुग्री लावुन वाहनाद्वारे घेवुन जाणे.)	रु._____ /- प्रती टन
३	कंपोस्ट मशिनच्या सहायाने झाडांचा पालापाचोळा व फांद्या यापासून कंपोस्ट खत तयार करणे. (मजुर/यंत्रसामुग्री लावुन वाहनाद्वारे घेवुन जाणे.)	रु._____ /- प्रती टन

निविदाधारकाची सही व शिक्का

MIRA BHAINDAR MUCIPAL CORPORATION

2nd Floor Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kankia, Miraroad (East) Tal.Dist.-Thane. 401107 Tel.No. 28103409

Commerical Bid

Name Of Work – Sale of sawdust, wood briquettes produced through the pruning of trees at the Ghodbunder project site within the Mira-Bhayandar Municipal Corporation area for a period of 5 years .

Name Of Agency : ……

& Add. : ……

Agency's Owner Name : ……..

& Add. : ……..

…….

A) Revenue received by the Municipal Corporation (Royalty)		
Sr.No	**Description**	**Rates (including all taxes)**
१	**Sawdust produced from branches at the Ghodbunder project site** (Carrying it by vehicle with the help of laborers/Machinery.)	Rs._____/- Per Tone
२	**wood briquettes processed from tree branches** (Carrying it by vehicle with the help of laborers/Machinery.)	Rs._____/- Per Tone
३	**Making compost from tree leaves and branches with existing compost machine.** (Carrying it by vehicle with the help of laborers/Machinery.)	Rs._____/- Per Tone

Place :- ----------

Date :- ----------

Agency's Seal & Signature

मिरा भाईंदर महानगरपालिका

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र. ०४, कै. विलासराव देशमुख भवन, जांगिड इन्क्लेव्ह,
कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी २८१०३४०९

निविदा पत्रकाविषयी नियम व अटीशर्ती सन २०२६-२०२७

१) निविदा पत्रका संबधीची सविस्तर माहिती संबधित खात्यातुन विनामुल्य मिळेल.

२) निविदा पत्रक किंमत (Receipt online system) ऑनलाईन सिस्टीमव्दारे भरण्यात यावी. चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही. तसेच निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही.

३) निविदेसाठी EMD Receipt online system ऑनलाईन स्विकारण्यात येईल. चेकने किंवा रोख रक्कम स्विकरली जाणार नाही.

४) निविदा बयाणा/सुरक्षा अनामत वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकारले जाणार नाही.

५) निविदाधारकाने नेटवर डाऊनलोड केलेल्या निविदा पत्रकातच दर भरुन N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in वर सादर केले पाहिजे.

६) निविदाधारकाने त्यांचे नाव, संपुर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.

७) निविदाधारकाने निविदा पत्रात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर प्रकल्प येथील झाडांची छाटणीपासून भुसा, लाकडी ठोकळे व कंपोस्ट खत तयार करून यांची ०५ वर्ष कालावधीकरीता विक्री करणे बाबतचे दर प्रमाणक याची माहिती विहित केलेल्या नमुन्यात रकान्यात भरणे आवश्यक आहे.

८) निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.

अ) लिफाफा क्र. १.मध्ये **(Envelop No. १)**

१) निविदेची फी (Tender Form Fee) – रु.१००० + रु.१८०/- (GST) = रु.११८०/-

२) बयाणा रक्कम – (Earnest Money Deposit) (EMD) – रु.२०,०००/-

३) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate)

४) पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागीदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे.)

५) सरासरी वार्षिक उलाढाल :-

निविदाकाराची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किंमतीच्या किमान ७५% असावी. याबाबत उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) Chartered Accountant (सनदी लेखापाल) यांनी प्रमाणित केलेले असावे.

६) A certificate from a government, semi-government, or local self-government body, confirming that the bidder has been engaged in the production and sale of wood briquettes, sawdust. etc.
(निविदाधारकाकडे शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेचे wood Briquette, भुसा चे उत्पादन आणि विक्रीचे काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र)

७) निविदाधारकांची (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोपायटरी फर्म्स इत्यादी संबंधीत सस्थांनचे नोंदणी प्रमाणपत्र.

८) निविदाकाराला गेल्या ५ वर्षामध्ये शासकीय / निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळ्या यादीत टाकलेले नाही याबाबतचे निविदाकाराच्या लेटर हेडवरील हमीपत्र.

९) निविदाकाराने निविदेसोबत सादर केलेल्या दस्ताऐवजांची सत्यता दर्शविणारे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

१०) घोडबंदर प्रकल्प या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केलेबाबतचे प्रमाणपत्र/पत्र ठेकेदार यांनी सादर करावे.

११) तसेच अट.क्र.०६ मधील अनुभवाची पूर्तता न झाल्यास खाजगी क्षेत्रातील wood Briquette, भुसा इत्यादीचा अनुभव ग्राह्य धरला जाईल.

ब) लिफाफा क्र. २.मध्ये (Envelop No. २)

निविदा पत्रक दरसुची अटी- शर्तीसह सादर करणे.

निविदापत्रक दरसुची संकेतस्थळावर Online उपलब्ध करुन देण्यात येईल त्यामध्येच दर भरावेत.

९) निविदाकारास सदर कामाकरिता लागणार आवश्यक तांत्रिक व क्षेत्रिय कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था स्वत:च करावी लागते.

१०) महानगरपालिकेमार्फत सदर कामाकरिता कोणत्याही प्रकारे वाहन पुरविण्यात येणार नाही.

११) सदरचे काम हे महानगरपालिकेस करून दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशामध्ये नमुद केलेल्या मुदतीत मुख्य उद्यान अधिक्षक किंवा इतर अधिकारी यांच्या देखरेखी खाली पुर्ण करून दयावयाचे आहे.

१२) महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येतील. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहता येईल. गैरहजर असले तरी निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडताना प्रथम Technical Bid उघडण्यात येतील त्यामधील कागदपत्रांची पुर्तता केली असेल तरच Financial Bid उघडण्यता येतील.

१३) कोणतीही निविदापत्रिका पुर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता एक अथवा सर्वच निविदा रदद करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

१४) निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास निविदाधारकास नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क फी (स्टॅप पेपर) सात दिवसाच्या आत मध्ये सादर करणे बंधणकारक राहील.

१५) सदर कामी ५% सुरक्षा अनामत रक्कम कार्यादेश देण्यापूर्वी महानगरपालिकेत जमा करणे बंधनकारक राहील.

१६) मंजुर निविदाधारकाकडून नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम, जी.एस.टी व इतर कर भरणा करणे बंधनकारक राहील.

१७) मंजूर निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर प्रकल्प येथील झाडांची छाटणीपासून भुसा, लाकडी ठोकळे, कंपोस्ट खत तयार करून यांची ०५ वर्ष कालावधीकरीता विक्री करण्याचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास संबंधीत खात्याकडून तक्रार आल्यास मंजूर निविदाधारक म्हणजेच व्दितीय पक्षीय (L१) यांची अनामत रक्कम जप्त करून सदर काम रदद करून सदरच्या कपंनीस काळया यादीत टाकण्यात येईल. तसेच (L२) कडुन सदर काम / पुरवठा करुन घेण्यात येईल व फरकापोटी असणारी रक्कम (L१) कडुन विहित पध्दतीने वसुल करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१८) सदरचे काम करण्याकामी उभयपक्षामध्ये काही वाद उपस्थिती झाल्यास वादाचे ठिकाण जिल्हा ठाणे असेल याची नोंद घेण्यात यावी.

१९) प्रकल्पामध्ये मध्ये आलेला उदयानातील व शहरातील झाडांचा कचरा यांचा वापर करून ब्रिकेट, भुसा व कंपोस्ट खत तयार करणे बंधनकारक राहील.

२०) दररोज आलेल्या झाडांच्या संपुर्ण छाटणीवर प्रक्रिया करणे बंधनकारक राहील.

२१) प्रकल्पामध्ये मध्ये असलेली सर्व यंत्रे चालवणे व दैनंदीन देखभाल दुरूस्ती करणे निविदाधारकास बंधनकारक राहील. दुरूस्तीकरीता मनपाकडून कोणतेही शुल्क दिले जाणार नाही.

२२) निविदाधारक यांच्याकडून सर्व यंत्रे विना व्यत्यय चालवण्यासाठी लागणारे कुशल व अकुशल मनुष्य पुरवठा करण्याची जबाबदारी राहील.

२३) सर्व यंत्रे विना व्यत्यय चालवण्यासाठी लागणारे सुटे भाग, स्पेअर पार्ट, हत्यारे व इतर कन्झुमेबल वस्तु योग्य प्रमाणात प्लॉट मध्ये उपलब्ध ठेवणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

२४) पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने विशेष काळजी घेणे भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खत तयार करताना पर्यावरणाला हानी पोहचनार नाही याची दक्षता घेणे.

२५) प्लांटमध्ये तयार झालेली सर्व भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खत यांची दैंनदीन नोंद ठेवणे बंधनकारक राहील.

२६) प्रकल्पा मध्ये भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खत विक्री करण्यासाठीचा खर्च व जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२७) लाकडी भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खत साठविण्यासाठी अतिरीक्त जागा ठेकेदाराला मिळणार नाही. त्यामुळे तयार झालेले भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खतची लवकरात लवकर विक्री करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२८) भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खत तयार करण्यासाठी लागणारा उदयानातील व इतर झाडांचा कचरा प्रकल्पाच्या ठिकाणी पोहचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

२९) घोडबंदर प्रकल्प या ठिकाणी असलेल्या ०२ कंपोस्ट मशिनच्या सहायाने कंपोस्ट खत तयार करणे.

३०) घोडबंदर प्रकल्प या ठिकाणी असलेल्या ०२ कंपोस्ट मशिन सद्यस्थितीत असलेल्या स्थितीत घेऊन काम सुरु करणे.तसेच दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्यास ठेकेदाराने दुरुस्त करण्यात यावी. तसेच वेळोवेळी मशीन दुरुस्ती करून कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी टाकणेस आलेल्या फांद्यावर तात्काळ प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने अतिरीक्त मशनरी Technical Staff स्वखर्चाने पुरवठा करुन घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील, तसेच सदर मशनरी करीता अतिरीक्त विज पुरवठा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

३१) उतपादन क्षमता –सदर ठेकेदारास तात्काळ फांद्यावर प्रक्रिया करून भुसा, ब्रिकेट व कंपोस्ट खत इत्यादीचे उत्पादन प्रति दिवस ०८ ते १० टन सुट्टीचे दिवस वगळून याप्रमाणे प्रती महिना २०० ते २५० टन करणे बंधनकारक असेल. अन्यथा सदर कामी केलेला करारनामा रद्द करून अनामत रक्कम जप्त करून काळ्या यादीत टाकण्यात येईल.

३२) सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशमध्ये नमुद केलेल्या मुदतीत पुर्ण करुन द्यावयाचे आहे.

३३) कोणतीही निविदा पुर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

३४) निविदाधारकाने करारनामा लिहून दिल्यावर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तात्काळ ठरवून दिलेल्या मुदतीत काम करणे बंधनकारक राहील

३५) प्रकल्पाच्या ठिकाणी वीज पुरवठा करण्याची व त्याचे बील अदा करण्याची जबाबदारी महापालिकेची राहील.

३६) प्रकल्पाच्या ठिकाणी काम जलद गतिने होण्यासाठी आवश्यक मशिन आणुन काम करावयाचे झाल्यास शेड व इतर व्यवस्था करण्याची जबाबदारी महापालिकेची राहील.

३७) घोडबंदर प्रकल्पाच्या ठिकाणी I (१st) Shift मध्ये सुरक्षारक्षक पुरवठा करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील व II व III Shift मध्ये १, १ सुरक्षारक्षक पुरवठा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची राहील

३८) सद्यस्थितीत असलेल्या मशीनरी आहे त्या स्थितीनुसार दुरुस्त करून काम चालु करावयाचे आहे तसेच ५ वर्ष कालावधी करीता प्रकल्प चालवणे व निगा देखभाल करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याकरीता मनपाकडून कोणतेही जादा देयक अदा केले जाणार नाही.

३९) प्रकल्पातील सद्यस्थितीत असलेल्या मशनरींची सद्यस्थितीत, देखभाल दुरुस्ती, उत्पादन क्षमता, प्रकल्पाची सद्यस्थीत इत्यादी सर्व गोष्टींची पाहणी करुन विचार करुन निगा व देखभालीचे दर भरण्यात यावेत.

४०) आवश्यकता असल्यात ज्यादा मशिनरी / सुधारित तंत्रज्ञान याचा वापर करून काम जलदगतिने करावयाचे आहे, याकरीता लागणाऱ्या मशिनरी खरेदी करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. याकरीता मनपाकडून कोणतेही जादा देयक अदा केले जाणार नाही.

४१) प्रकल्पाच्या ठिकाणी पाण्याची सोय करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

४२) सदर कामाचे दर भरताना कंत्राटदाराने प्रकल्पाची पाहणी करून व निविदेत अंतर्भूत केलेल्या बाबीचा विचार करून दर भरण्यात यावेत.

४३) safety requirements :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर प्रकल्प येथील झाडांची छाटणीपासून भुसा, लाकडी ठोकळे तयार करून यांची ०५ वर्ष कालावधीकरीता विक्री करण्याचे काम करते वेळी कोणत्याही व्यक्तीस अथवा / कर्मचा-यास /कामगारास कुठल्याही प्रकारची इजा, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Loss of Life) त्याबाबतची सर्व खर्चाची व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

४४) Financial & legal liability:- करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तिय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

४५) Subcontract:- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर प्रकल्प येथील झाडांची छाटणीपासून भुसा, लाकडी ठोकळे तयार करून यांची ०५ वर्ष कालावधीकरीता विक्री करण्याचे काम सबकॉन्ट्रक्टर / कंपनी / ठेकेदार / इतर व्यक्ती यांना देता येणार नाही.

४६) सदरची निविदा मिळविण्याकरिता महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढळल्यास निविदाधारकास / यशस्वी निविदाधारक यांची निविदा रदद करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

४७) निविदाधारकाची निविदा नामंजुर झाल्यास त्याच्या EMD परत मिळविण्यासाठी मुळ पावतीसह अर्ज केल्यास त्वरीत परत करण्यात येतील. सदर EMD वर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही.

४८) निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेतील नियम व अटी मान्य असल्याबददल त्यावर शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४९) सदर निविदेचा कालावधी ०५ वर्षाकरीता राहिल. परंतू काही कारणास्तव सदर करारनाम्याचा कालावधी वाढवावा लागल्यास, निविदाधारक यांचे काम समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त यांस राहिल. सदर वाढीव कालावधीच्या करारनाम्याची मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी निविदाधारक यांची राहिल.

(कविता बोरकर)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
मा. उप-आयुक्त सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प).

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वरील निविदेचे सर्व नियम व अटी मी / आम्ही वाचल्या असुन त्या संबधीची सर्व माहिती समजावुन घेतली आहे. निविदेसंबधी माझी / आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदापत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

वरील निविदांचे नियम व अटी मला / आम्हाला बंधनकारक व मान्य आहेत.

दिनांक :-

निविदाधारकाची सही

शिक्का :-

नाव :- _____

पत्ता :- _____

_____

_____